# मुंबई विद्यापीठ

## विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणूकीसाठी प्राचार्य/संचालक, व्यवस्थापन प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि विभाग प्रमुख या मतदार संघाच्या तात्पुरत्या मतदार याद्या प्रसिध्द करणेबाबत.

**जाहीर प्रकटन**

**क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२२-२३/३८१.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २८(२)(ण)[28(2)(o)] अन्वये संलग्न, संचालित व स्वायत्त महाविद्यालयांचे १० प्राचार्य/संचालक, कलम २८(२)(त)[28(2)(p)] अन्वये संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्थेच्या ०६ व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, कलम २८(२)(द)[28(2)(r)] अन्वये महाविद्यालयीन/परिसंस्थेतील १० अध्यापक, कलम २८(२)(ध)[28(2)(s)] अन्वये ०३ विद्यापीठ अध्यापक अधिसभेवर व कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] नुसार ८ अध्यापक (प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे ०२ अध्यापक) विद्यापरिषदेवर आणि कलम ४०(२)(ग)[40(2)(c)] अन्वये महाविद्यालयातील/परिसंस्थातील ०३ विभाग प्रमुख अभ्यासमंडळावर निवडून देण्याची तरतुद आहे.

महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्या क्र. ८ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात आलेल्या प्राचार्य/संचालक, व्यवस्थापन प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक आणि विभाग प्रमुख यांच्या तात्पुरत्या मतदार याद्या तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांच्या याद्या (कारणासहीत) **सोमवार, दिनांक ०६ मार्च, २०२३** रोजी विद्यापीठाच्या **https://mu.ac.in** या संकेतस्थळावरील **Election 2022** या लिंकवर किंवा **https://mu.eduapp.co.in** या संकेतस्थळावर Voter List या सदराखाली (Tab) प्रसिध्द केल्या आहेत.

सदर तात्पुरत्या मतदार यादीमध्ये वगळलेल्या किंवा चुकीच्या कोणत्याही नोंदी निदर्शनास आल्यास सदर नोंदी **सोमवार, दिनांक ०६ मार्च, २०२३ ते शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३** पर्यंत स्पष्टीकरणासह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने निदर्शनास आणून द्याव्यात.

**सदर नोंदी निदर्शनास आणून देण्याची ऑनलाईन पध्दत खालीलप्रमाणे आहे.**

१. विद्यापीठाच्या **https://mu.ac.in** या संकेतस्थळावरील **Election 2022** या लिंकवर किंवा **https://mu.eduapp.co.in** या संकेतस्थळावर आपल्या संबंधित प्राधिकारणाच्या **login** मध्ये जाऊन आपल्या अर्जाची स्थिती पाहता येईल.

२. यासंदर्भात तात्पुरत्या मतदार याद्यांमधील काही वगळलेल्या किंवा चुकीच्या नोंदी निदर्शनास आणून द्यावयाच्या असतील, तर तेथे उपलब्ध करून दिलेल्या **Add Grievance** या **Tab** वर **Click** करून तेथील रकान्यामध्ये सदर बाब स्पष्टीकरणासह नोंदवावी. सदर स्पष्टीकरणाबाबत असणारे कागदपत्रे दिलेल्या संबंधीत जागेवर अपलोड करावेत.

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : ०६ मार्च, २०२३
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.